| | |
|---|---|
| | प्रकरण दाखल तारीख : १८/१०/२०२४<br>प्रकरण फैल तारीख : १८/१०/२०२४<br>प्रकरण निकाल तारीख : ०२/०७/२०२६<br>कालावधी : वर्षे महिने दिवस<br>०१ ०८ १४ |

**<u>न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग , श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांचे न्यायालयात</u>**

**<u>(पिठासीन अधिकारी समीर कादर शेख यांचे समक्ष)</u>**

**<u>न्यायनिर्णय</u>**

**<u>(निशाणी क्रमांक २८/ब)</u>**

(**नियमीत फौजदारी प्रकरण क्र.६१/२०२४**)

**दिघी सागरी पोलीस ठाणे प्रथम खबरी अहवाल क्र.३८/२०२४**

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>तर्फे दिघी सागरी पोलीस ठाणे<br>(सहा. सरकारी अभियोक्ता श्री.मुकेश पाटील) |
| आरोपी | १. अंजर अली मकबुल पिरकर, वय : ३९ वर्ष,<br>२. अबु कलाम अब्दुल रहेमान उंड्रे, वय : ४५ वर्ष,<br>३. सुफीयान शब्बीर उंड्रे, वय : ३० वर्ष,<br>४. मिनाज एजाज कंद्रोजी, वय : ४० वर्ष,<br>सर्व रा. बोर्लीपंचतन, श्रीवर्धन, रायगड<br>(वकील श्री. वढावकर) |

| | |
|---|---|
| घटना तारीख | ०४/०४/२०२४ |
| पहिली खबर दिनांक | ०४/०४/२०२४ |
| दोषारोप दाखल दिनांक | १८/१०/२०२४ |
| आरोप निश्चितीचा दिनांक | १७/०९/२०२५ |
| संपरीक्षा सुरु झाल्याचे दिनांक | १७/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय | ०२/०७/२०२६ |

| | |
|---|---|
| अंतिम आदेश | आरोपींना निर्दोष करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| अ.क्र. | आरोपीचे नांव | आरोपीच्या अटकेचा दिनांक | जमानतीवर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष अथवा शिक्षा | शिक्षा | फौ.प्र.सं.चे कलम ४२८ अन्वये कारागृहात व्यतित केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अंजर अली मकबुल पिरकर | ०१/०८/२०२४ | ०७/०८/२०२४ | भा. दं. वि. चे कलम ३८२, ३५४, ३२४, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे | निर्दोष | निर्दोष सोडण्यात आले | काही नाही. |
| २ | अबु कलाम अब्दुल रहेमान उंड्रे | वरील प्रमाणे | ०२/०८/२०२४ | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ३ | सुफीयान शब्बीर उंड्रे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ४ | मिनाज एजाज कंद्रोजी | अटक नाही | अटकपुर्व जामीन | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

## अभियोग पक्षाचे साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| सा. १ | मोबीन अब्दुल लतीफ वरवंडे | फिर्यादी |
| सा.२ | अमीना सोहेल मुकादम | साक्षीदार |
| सा.३ | आरीफ मोहम्मद अय्युब अन्सारी | साक्षीदार |

## आरोपी तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## न्यायालयीन साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द करण्यात आलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## आरोपीतर्फे सिध्द करण्यात आलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**<u>न्यायालयातर्फे निशाणी दिलेले दस्त</u>**

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**<u>मुद्देमाल</u>**

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

आरोपीची प्रस्तुत खटल्याद्वारे भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३८२, ३५४, ३२४, ३२३, ५०४, ३४ अन्वये संपरीक्षा घेण्यात आली.

२. फिर्यादी, साक्षीदार व आरोपी हे रॉयल एज्युकेशन सोसायटी, बोर्लीपंचतन येथील सदस्य आहेत.

३. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, दि.०४/०४/२०२४ रोजी सदरच्या सोसायटीच्या डॉ. ए.आर. उंड्रे या शाळेत धर्मदाय आयुक्त अलिबाग यांनी पारीत केलेल्या आदेशाबाबत बैठक ठेवण्यात आली होती. बैठकीमध्ये फिर्यादी, साक्षीदार व इतर सदस्य हजर होते. बैठक संपल्यानंतर सुमारे सकाळी ११.४५ वाजता फिर्यादी हा त्यांचे मुख्यकार्यकारी अधिकारी कार्यालय उघडण्याकरिता गेले असता त्यांनी पाहिले की, कार्यालयाचे कुलुप तुटलेले आहे. ते व आसीफ अन्सारी असे दोघेही कार्यालयाचा दरवाजा उघडून पाहिला असता त्यांना आतमध्ये आरोपी क्र.१ आंथरुण टाकूण झोपलेला दिसला. तदनंतर फिर्यादी सदर कार्यालयामधील कपाट उघडण्याकरिता गेले असता आरोपी क्र.१ हा झोपेतून उठला. त्यावेळी फिर्यादी हे त्यांचे कागदपत्रांचे कपाट उघडत असताना आरोपी क्र.१ यांनी सदर कपाटात फिर्यादी यांनी यापुर्वी ठेवलेल्या काळया रंगाचा एचपी कंपनीचा लॅपटॉप व रोख रक्कम १.५ लाख त्यांच्या समक्ष घेऊन गेला. त्यावेळी फिर्यादीने आरोपी क्र.१ यास अडविण्याचा प्रयत्न केला असता, आरोपी क्र.१ याने लोखंडी सळईने फिर्यादी यांना मारहाण केली व पळून

गेला. त्यानंतर थोडयावेळाने आरोपी क्र.१ ने परत येवून फिर्यादीवर खोटी केस दाखल करण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादी औषधोपचार करण्याकरिता दवाखान्यात जात असताना सर्व आरोपी त्या ठिकाणी आले व फिर्यादीला हातबुक्क्यांनी मारहाण करु लागले. त्यावेळी तेथे हजर असलेल्या शिक्षीका अमीन मुकादम या मोबाईलमध्ये चालु असलेल्या घटनेचा व्हीडीओ काढत असताना आरोपी क्र.१ ने तिच्या अंगावर जावून तिचा हात धरुन तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशनला जावुन घडलेल्या घटनेबाबत फिर्याद दाखल केली. म्हणुन ही प्रस्तुतची फिर्याद.

४. सदर फिर्यादी आधारे दिघी सागरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३८/२०२४ भारतीय दंड संहिता कलम ३८२, ३५४, ३२४, ३२३, ५०४, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. श्री.अर्शद शेख, पोलीस उपनिरिक्षक यांनी केसचा तपास करून दोषारोपपत्र दाखल केले. तपासाअंती तपासी अधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवून घेतेल व घटनास्थळी जावुन घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. दोषारोप भारतीय दंड संहिता कलम ३८२, ३५४, ३२४, ३२३, ५०४, ३४ अन्वये दाखल करण्यात आले.

५. आरोपींविरुध्द नि.क्र.१८ वर भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३८२, ३५४, ३२४, ३२३, ५०४, ३४ अन्वये प्रतिकथन निश्चित केले. सदर प्रतिकथन आरोपींना वाचून व त्यांना त्यांच्या भाषेत समजावून सांगण्यात आले. आरोपींनी त्यास नकार देऊन संपरिक्षेची मागणी केली.

६. अभियोगपक्षातर्फे आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी सदरचे साक्षीदारांचे साक्ष नोंदवून घेतली आहे. यातील फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांच्यातील वाद मिटलेला असुन प्रस्तुत प्रकरणात पुरसीस निशाणी क्र.२२ वर दाखल केली आहे.

पुरसीसवर फिर्यादी व आरोपींची, साक्षीदाराची सही आहे. आरोपींचा गुन्हयाशी संबंध दर्शविणारा कोणताही पुरावा न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ खाली निवेदन नोंदविण्यात आले नाही.

७. अभियोग पक्षाचे कथन आणि पुरावा तसेच आरोपींच्या बचावाचा विचार करता पुढील विचाराधीन मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित झाले असुन त्यावर माझे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०४/०४/२०२४ रोजी, सकाळी ११.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे बोर्लीपंचतन, श्रीवर्धन, रायगड येथे असलेल्या 'उंड्रे हायस्कूल' मध्ये, आरोपींनी संगनमत करुन सदरच्या शाळेत जबर चोरी करुन शाळेतील १ लॅपटॉप, १.५ लाख रुपये रोख रक्कम यांची चोरी केली म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३८२ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा या कार्यक्षेत्रात केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय? | नाही. |
| २. | वर नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी, आरोपींनी संगनमत करुन, पिडीत महिला नामे अमीना मुकादम तिच्या अंगावर जावुन तिचा हात धरुन तिचे मनास लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३५४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा या कार्यक्षेत्रात केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय? | नाही. |
| ३. | वर नमूद केलेल्या दिवशी वेळी व ठिकाणी, आरोपींनी संगनमत करुन, फिर्यादी आणि साक्षीदार यांना हाताबुक्कयांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | नाही. |
| ४. | वर नमूद केलेल्या दिवशी वेळी व ठिकाणी आरोपींनी | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | संगनमत करुन, फिर्यादी यांना लोखंडी रॉडने मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | |
| ५. | वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना उद्देशपुर्वक अपमान करुन, त्यांना प्रक्षोभित केले तसेच सार्वजनिक शांततेचा भंग केला किंवा अन्य कोणताही अपराध घडवा या उद्देशाने शांतता भंग केला म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | नाही. |
| ६. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **<u>कारणमीमांसा</u>** :

**<u>मुद्दा क्र.१ ते ५ करीता :–</u>**

८. सर्व मुद्दे एकाच घटनेशी संलग्न असल्याने विवेचन करण्यास सोयीचे होईल तसेच त्यामुळे पुनरावृत्ती टळेल याकरिता ते एकत्रात चर्चिले आहेत.

९. फिर्यादी, साक्षीदार व आरोपींनी नि.क्र.२२ कडे पुरसीस दाखल करुन सदर केसमध्ये त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे सांगीतले आहे. त्या अनुषंगाने फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांच्यामध्ये कोणताही वाद राहिलेला नाही असे सांगितले आहे.

१०. साक्षीदार क्र.१ हा सदर केस मधील फिर्यादी आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे सांगितले की, आरोपींनी त्यांच्या कार्यालयातून कथील लॅपटॉप व रोख रक्कम जबर चोरी केलेली नव्हती. तसेच आरोपींनी त्यांना लोखंडी रॉडने व हातबुक्क्यांनी मारहाण केलेली नव्हती. त्यांनी फिर्याद मधील नमूद घटनाच नाकारलेली आहे. साक्षीदार क्र.२ ही विनयभंगाची पिडीता आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे सांगीतले आहे की,

त्यांच्याबरोबर कथीत घटना घडलेली नव्हती. आरोपींनी सदरच्या शाळेत जबर चोरी करुन त्यांच्या मनात लज्ज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केलेले नव्हते. त्यांनी सुध्दा फिर्याद मध्ये नमूद घटना नाकारलेली आहे. साक्षीदार क्र.३ हे सदर शाळेतील मुख्याध्यापक आहे. तयांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, आरोपींनी त्यांच्या शाळेतून रक्कम व लॅपटॉप चोरी केलेली नव्हती. तसेच आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण केलेली नव्हती. त्यांनी सुध्दा फिर्यादीमधील घटना नाकारलेली आहे. सरकारी अभियोक्ता यांनी सदरचे साक्षीदार हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेने त्यांचा उलटतपास घेतला असता सदर उलटतपासात देखील आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणणेस अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. उलट साक्षदारांनी आरोपींसोबत त्यांनी कोर्टाबाहेर तडजोड केली आहे, त्यांची आरोपींविरुद्ध कोणतीही तक्रार नसलेचे सांगितले आहे. यावरुन सदर साक्षीदार हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेचे दिसून येते.

११. सदर साक्षीदारांच्या पुराव्यावरून आरोपी व त्यांच्यातील वाद मिटलेला असून तडजोड झालेली आहे असे दिसून येते व ही बाब सदर साक्षीदारांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केली आहे. त्यामुळे आरोपीविरूद्ध सदर साक्षीदार काहीही कथन करण्यास इच्छीत नाही असे स्पष्ट होते. सदरच्या साक्षीदारांनी घटना नाकारल्यामूळे आरोपींनी संगनमत करुन कथीत घटना म्हणजेच सदर शाळेतील सदरची वस्तू व रक्कम जबर चोरी करुन साक्षीदारांना शिवीगाळ करुन मारहाण करुन तसेच साक्षीदार क्र.२ हिच्या मनात लज्ज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचे सिध्द होत नाही. अभिलेखावर कोणताही तोंडी पुरावा आलेला नाही की, ज्या आधारे असे म्हणता येईल की, आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३८२, ३५४, ३२४, ३२३, ५०४, ३४ अन्वये दंडनीय गुन्हा केला आहे. सबब मुद्दा क्रमांक १ ते ५ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्रमांक ६ करीता

१२. मुद्दा क्र.१ ते ५ च्या निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.६ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. **आरोपी क्र.१ अंजर अली मकबुल पिरकर, आरोपी क्र.२ अबु कलाम अब्दुल रहेमान उंड्रे, आरोपी क्र.३ सुफीयान शब्बीर उंड्रे व आरोपी क्र.४ मिनाज एजाज कंद्रोजी** यांना भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३८२, ३५४, ३२४, ३२३, ५०४, ३४ च्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामिनदाराचा जामिन कतबा रद्द करण्यात येतो.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे जामिनाची पुर्तता करावी.

४. मुद्देमाल १ लाल व काळयारंगाचा सॅडिस्कचा पेनड्राईव्ह याची अपील कालावधीनंतर कायद्यानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

५. सदर निकालाची प्रत जिल्हाधिकारी रायगड यांना पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

SAMEER KADER SHAIKH
Digitally signed by SAMEER KADER SHAIKH
Date: 2026.07.02 12:32:03 +0530

ठिकाण :– श्रीवर्धन **(श्री. एस. के. शेख)**

दिनांक :– ०२/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन.

# प्रमाणपत्र

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, या पी.डी.एफ. फाईल न्यायनिर्णयातील आशय हा मूळ न्यायनिर्णयातील शब्दा शब्दा प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | श्री. एस. के. शेख, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड. |
| लघुलेखकाचे नाव | : | श्री. राहुल सुनिल मराठे (श्रेणी–३) |
| न्यायनिर्णयाची दिनांक | : | ०२/०७/२०२६ |
| पिठासिन अधिकाऱ्यांनी न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक | : | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | : | ०२/०७/२०२६ |